# एम इ पी इन्फ्रास्ट्रक्चर डेवलपर्स लिमिटेड

**सीआयएनः** U45200MH2002PLC136779
रजिस्टर्ड ऑफीसः ए - 412, बूमरँग, चांदिवली फार्म रोड, चांदिवली स्टुडिओ जवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई 400 072
इ-मेल**: investorrelations@mepinfra.com** वेबसाईट**: www.mepinfra.com**
टेलिफोन **: 91 22 6120 4800** फॅक्स**: 91 22 6120 4804**

13 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, सभासदांचे रजिस्टर बंद करणे,
आणि
रिमोट-इ-व्होटींगची माहिती

या द्वारे सूचना देण्यात येत आहे की, एम इ पी इन्फ्रास्ट्रक्चर डेवलपर्स लिमिटेड ची 13 वी वार्षिक सर्वसाधारण सभा ("13 वी एजीएम") बुधवार, दिनांक 23 सप्टेंबर 2015 रोजी 11.30 वाजता, हॉल ऑफ कल्चर, नेहरु सेंटर, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी मुंबई - 400 018, येथे होणार आहे. या सभेमध्ये 13 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या (एजीएम) सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे साधारण आणि विशेष बाबी तसेच त्याविषयीच्या स्पष्टीकरणात्मक विवरणावर चर्चा केली जाणार आहे:

या द्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, कंपनी ॲक्ट 2013 च्या कलम 91 अन्वये, कंपनी (मॅनेजमेंट ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन) नियम 2014 च्या नियम 10 सोबत वाचून तसेच लीस्टींग ॲग्रीमेंट (वेळोवेळी सुधारणा केल्या प्रमाणे) मधील कलम 16 अन्वये, कंपनीच्या सभासदांचे रजिस्टर शनिवार दिनांक 19 सप्टेंबर 2015 ते बुधवार दिनांक 23 सप्टेंबर 2015 (दोन्ही दिवस समाविष्ट) (पुस्तक बंद करण्याच्या तारखा स्टॉक एक्सचेंजशी चर्चा करुन निश्चित करण्यात आल्या आहेत) या काळात 13 व्या एजीएम साठी बंद रहाणार आहे.

या पुढे, 13व्या एजीएम मध्ये चर्चेस घेतले जाणारे विषय तसेच कंपनीचा वार्षिक अहवाल यासह 13 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना कंपनीच्या भागधारकांना वैयक्तिक रित्या त्यांच्या नोंदणीकृत पत्यावर पाठविण्यात आली आहे. ज्या सभासदांचे इ-मेल ॲड्रेसेस नोंदणीकृत आहेत त्यांना वर नमूद केलेले कागदपत्र त्यांच्या पत्यावर इलेक्ट्रॉनिकली पाठवले आहेत.

भागधारकांना या द्वारे सूचित करण्यात येत आहे की, 13व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वर नमूद केलेले कागदपत्र कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत (www.mepinfra.com) आणि कंपनीच्या रजिस्टर्ड कार्यालयात 13व्या एजीएमच्या दिवसापर्यंत कोणत्याही कार्यालयीन दिवशी तपासण्यासाठी उपलब्ध आहेत.

कंपनी ॲक्ट 2013 चे कलम 108 आणि कंपनीचे (मॅनेजमेंट ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन) नियम 2014चा नियम 20, तसेच सुधारीत कंपनीचे (मॅनेजमेंट ॲण्ड ॲडमिनिस्ट्रेशन) नियम 2015 आणि लीस्टींग ॲग्रीमेंटच्या कलम 35 बी च्या तरतूदींनुसार आपल्या सभासदांना त्यांचा मतदानाचा अधिकार इलेक्ट्रॉनिक साधनांच्याद्वारे बजावण्याची सुविधा उपलब्ध करण्यास कंपनीस आनंद होत आहे. 13व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठिकाणाशिवाय अन्य ठिकाणाहून (रिमोट इ-व्होटींग) इलेक्ट्रॉनिक वोटींग सिस्टीमचा वापर करुन मत देण्याची सुविधा नॅशनल सेक्युरीटीज डिपॉजीटरी लिमिटेड (एनएसडीएल) द्वारे पुरविली जाईल.

रिमोट इ-व्होटींग सुविधा रविवार दिनांक 20 सप्टेंबर 2015 रोजी 9.00 वाजता सुरु होईल आणि मंगळवार दिनांक 22 सप्टेंबर 2015 रोजी 5.00 वाजेपर्यंत उपलब्ध असेल आणि त्यानंतर इ व्होटींग मोड्यूल बंद करण्यात येईल. या वेळेनंतर इ व्होटींग करण्याची परवानगी मिळणार नाही. या वेळेत कंपनीचे भागधारक 13व्या एजीएम च्या सूचनेमध्ये नमूद केलेया अटीनुसार इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्यांचे मतदान करु शकतील. भागधारकाने एखाद्या ठरावावर एकदा मत दिले की त्याला ते नंतर बदलता येणार नाही.

सभासदांना रिमोट इ-व्होटींग संबंधीचा पत्रव्यवहार जसे की यूजर आय डी, पासवर्ड तसेच सभा बोलावण्यासंबंधीच्या सूचनेची प्रत पाठवण्यात आली आहे. हा पत्रव्यवहार आणि सभेची सूचना कंपनीच्या संपर्क स्थळावर - www.mepinfra.com आणि एनएसडीएलच्या संकेत स्थळावर URL:https://www.evoting.nsdl.com/ वर उपलब्ध आहे.

ही सूचना पाठवल्यानंतर कोणत्याही व्यक्तीने जर कंपनीचे भाग मिळविले असतील आणि ज्यांचे नाव सभासदांच्या/लाभार्थी मालकाच्या रजिस्टरमध्ये खंडित दिनांक म्हणजेच 18 सप्टेंबर 2015 रोजी नमूद आहे त्यांना, evoting@nsdl.co.in किंवा rnt.helpdesk@linkintime.co.in. येथे विनंती पाठविल्यावर यूजर आयडी आणि पासवर्ड पाठवण्यात येईल. यूजर आयडी आणि पासवर्ड मिळविण्यासंबंधीची कार्यपध्दती 13 व्या (एजीएम) सभेच्या सूचनेमध्ये नमूद केली आहे तसेच कंपनीच्या आणि एनएसडीएलच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. जर एखादा सभासद एनएसडीएल आधीच नोंदणीकृत असेल तर त्याला इ-व्होटींगसाठी अस्तित्वात असलेला यूजर आयडी आणि पासवर्ड, इ-व्होटींगमधून मत देण्यासाठी वापरता येईल.

ज्या सभासदांनी रिमोट इ-व्होटींग पद्धतीने मतदान केले असेल ते सभेला हजर राहू शकतील. परंतु त्यांना पुन्हा मत देता येणार नाही. सभेच्या ठिकाणी मतपत्रिकेद्वारे मत देण्याची सुविधा उपलब्ध असेल. तसेच सभेस उपस्थित असलेले सभासद, ज्यांनी रिमोट इ-व्होटींग पद्धतीने मतदान केले नसेल त्यांना मतपत्रिकेद्वारे मतदान करता येईल.

इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदानासंबंधी कोणतीही शंका किवा तक्रार असल्यास सभासद/लाभार्थी मालक सभासदासाठीचे वरचेवर विचारले जाणारे प्रश्न (एफ ए क्यूज) संदर्भित करु शकतात आणि इ-व्होटींगचे उपयोक्ता मॅन्युअल एनएसडीएल च्या URL:https://www.evoting.nsdl.com/ च्या डाऊनलोड सेक्शन मधून संदर्भित करु शकतात किंवा श्रीमती पल्लवी म्हात्रे, सहायक व्यवस्थापक,नॅशनल सेक्युरीटीज डिपॉजीटरी लिमिटेड , ट्रेड वर्ल्ड, "ए विंग", चौथा मजला, कमला मिल्स कंपाउंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई – 400013, फोन (022) 2499 4545 इ-मेल: evoting@nsdl.co.in किंवा pallavid@nsdl.co.in किंवा टोल फ्री क्रं. 1800 22 2990 वर संपर्क साधू शकतात.

मंडळाच्या आदेशानुसार
करिता एम इ पी इन्फ्रास्ट्रक्चर डेवलपर्स लिमिटेड
Sd/-
श्रीधर फडके
कंपनी सेक्रेटरी

ठिकाणः मुंबई
दिनांकः 29/08/2015